दैनिक
लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

'हा निव्वळ अपघात, यात कोणीही राजकारण आणू नये', अजित पवारांच्या अपघाती मृत्यूवर शरद पवारांची प्रतिक्रिया

पुणे दि.२८ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान अपघातात निधन झालं आहे. आज (२८ जानेवारी) सकाळी ही घटना घडली आहे. अजित पवार हे एका खासगी विमानाने मुंबईवरून बारामतीला येत होते. यावेळी विमानाचं लँडिंग होत असताना विमानाचा अपघात झाला आणि या अपघातात अजित पवार यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाला आहे. अजित पवारांच्या अपघाती मृत्यूवर प्रतिक्रिया देताना शरद पवारांना देखील अश्रू अनावर झाले होते. 'हा निव्वळ अपघात असून यात कोणीही राजकारण आणू नये', अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे. 'अजित पवार यांचा अपघाती मृत्यू हा महाराष्ट्राला प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्ववान आणि निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र आज मुकला आहे. जे काही नुकसान झालंय ते भरून निघणारं नाही, पण सगळ्याच गोष्टी काही आपल्या हातात नसतात', असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. 'मी आज मीडियासमोर येणार नव्हतो, पण काही माध्यमांमध्ये ह्या अपघातामागे काही राजकारण आहे अशा प्रकारची भूमिका कलकत्त्यावरून मांडली गेली असं कळलं. पण यात राजकारण नाही, हा निव्वळ अपघात आहे. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूच्या यातना महाराष्ट्राला आणि आम्हा सगळ्यांना आहेत. कृपया यात राजकारण आणू नये, एवढंच सांगायचं आहे', असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

(वर्ष ६५ वे अंक ४०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.२९ जानेवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

राज्याचे धुरंधर उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघातात निधन

अवघ्या महाराष्ट्रावर शोककळा; आज कर्मभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार

पुणे दि.२८ (प्रतिनिधी)- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांचे आज (२८ जानेवारी) रोजी दुःखद निधन झाले आहे. बारामतीत झाल ल्या विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी बारामतीत मेडिकल कॉलेजबाहेर समर्थकांची गर्दी उसळली आहे. तर, संपूर्ण पवार कुटुंबही बारामतीत दाखल झाले आहेत. उद्या, २९ जानेवारी रोजी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत. दरम्यान, महाराष्ट्रात २८ ते ३० जानेवारी २०२६ या तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे.

दरम्यान, अजित पवारांचं पार्थिव आज सायंकाळी ४ वाजल्यापासून विद्याप्रतिष्ठान विद्यानगरी चौक येथील मैदानात अंत्यदर्शनाकरता रात्री उशिरापर्यंत नागरिकांसाठी ठेवण्यात येणार आहे. उद्या (२९ जानेवारी) सकाळी ९ वाजता गदिमा सभागृहापासून अंत्ययात्रा निघेल. गदिमा चौक, विद्यानगरी चौक, विद्याप्रतिष्ठानचा अंतर्गत रस्ता, मराठी शाळेच्या गेटने विद्याप्रतिष्ठ ानच्या मैदानावर जाईल. सकाळी ११ वाजता विद्याप्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यसंस्कार होईल.

बारामती येथे विमानाचे लँडिग होत असताना अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की विमान जळून खाक झाले आहे. आज बारामतीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या चार सभा होणार होत्या. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक प्रचारासाठी या सभांचे आयोजन करण्यात आले होते. सुपे जिल्हा परिषद गटासाठीही एक सभा होणार होती. यासाठी अजित पवार विमानाने मुंबईहून बारामतीमध्ये आले होते. मात्र विमानाचे लँडिंग होत असताना हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, शरद पवारांसह संपूर्ण कुटुंब बारामतीत दाखल झालं असून उद्या, २९ जानेवारी रोजी अजित पवारांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

दरम्यान, यात अजित पवारांसह मुंबई पीएसओ ण विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शांभवी पाठक, फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी होते. या सर्वांचा यात मृत्यू झाला आहे. मुंबईतून हे विमान सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी निघाले होते. तर, बारामती येथे ८.५० मिनिटांनी पोहोचले. ल ँडिंग करत असतानाच या विमानाचा अपघात झाला अन् आतील प्रवाशांचा मृत्यू झाला. खासदार सुप्रिया सुळे यांनी व्हॉ ट्सॲप स्टेटसवर अँ्नू असा एक इंग्रजी शब्द ठेवून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मात्र काही वेळाने हे स्टेटस डिलीट करण्यात आले.

दरम्यान, राज्यात तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. या तीन दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल. तसेच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नयेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये बंद राहतील, असे कळविण्यात आले आहे.

अजित पवारांच्या अंत्यसंस्काराला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह राज्यातील मंत्रिमंडळातील नेते उपस्थित राहणार आहेत. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मोदी यांनी शरद पवार यांना फोन करून सांत्वन केले. अजित पवारांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह देशातील नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली. राज्यभरातूनर कार्यकर्तेही मोठ्या प्रमाणात बारामतीमध्ये दाखल झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बारामतीमध्ये पोहोचले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उद्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीमध्ये पोहोचणार आहेत.

अपघाताचे वृत्त समजताच पवार कुटुंबीयांसह अवघ्या राज्याला मानसिक धक्का बसला. अर्थसंकल्पीय अधिवेशनामुळे पत्नी खासदार सुनेत्रा पवार, बहीण सुप्रिया सुळे या दिल्लीमध्ये होत्या. त्यांचे विमानाने बारामतीमध्ये आगमन झालं. दुसरीकडे काका शरद पवार मुंबईमध्ये होते. वैद्यकीय तपासणी करून आल्यानंतर कुटुंबीयांनी अजित पवार यांच्या निधनाची माहिती देण्यात आली. त्यानंतर एक एक करून हे सर्व पवार कुटुंबीय बारामती वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पोहोचले. बारामतीमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अजित पवार यांचे पार्थिव ठेवण्यात आलं होतं. याठिकाणी अजित पवारांच्या पार्थिवाच्या दर्शनासाठी लाखोंचा जमाव पोहोचला. दुपारी तीनच्या सुमारास अजित पवारांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानमध्ये आणण्यात आले.

प्रत्यक्षदर्शी महिलेने सांगितले की, विमानाचा स्फोट इतका जोरदार होता की कोणीही काहीही करू शकले नाही. बचाव पथक आले आणि आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी सुद्धा आम्हाला पाणी आणण्यास सांगितले. आम्ही बादल्यांमध्ये पाणी आणले. अजित पवार यांचे शरीर एका बाजूला पडले होते. आम्ही ते आमच्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले. आम्ही एक नवीन ब्लँकेट दिले आणि त्यांचे शरीर त्यात गुंडाळले. सुमारे अर्धा तास आग सुरु होती. चष्मा आणि घड्याळावरून आम्हाला ते अजित दादा असल्याचे ओळखता आले.

अजित पवार यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील काटेवाडी आहे. मात्र, त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली (प्रवरा) या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी अजित पवार मुंबईत आले, शिक्षण पूर्ण करून बारामतीला आले आणि तेथील सहकारी संस्थांमधून त्यांनी सामाजिक व राजकीय कार्याला सुरुवात केली. अजित पवार यांनी १९८२ साली राजकारणात प्रवेश केल्यानंतर ते अखेरचा श्वास घेण्यापर्यंत ते राजकारणात सक्रिय राहिले. अजित पवार यांनी १९९५ पासून बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत.

पवार कुटुंबीयांचे वलय महाराष्ट्रासाठी नवीन नाही. गेल्या सहा दशकांपासून पवार कुटंबीयांचं गारुढ समाज आणि राजकारणावर राहिलं आहे. शरद पवारांनी राष्ट्रवादीची स्थापना झाल्यानंतर अजित पवार यांनी केलेल्या बंडानंतर त्याची दोन शकले झाली. त्यामुळे कुटुंबातही विसंवाद झाला होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून झालं गेलं विसरून गेलं म्हणत अजित पवार आणि शरद पवार यांच्यातील राजकीय वादाची दरी कमी झाली होती. १२ डिसेंबर रोजी शरद पवार यांच्या वाढदिनी अजित पवार एकत्र जमले होते. त्यानंतर बारामतीमध्ये झालेल्या विद्या प्रतिष्ठानमध्ये झालेल्या कार्यक्रमातही हे काका पुतण्या एकत्र आले होते. महानगरपालिका निवडणुकीपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा रंगली होती. मात्र, काळाने घातलेल्या झडपेत या सर्व आठवणी आता भुतकाळात गेल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची अपरिमित हानी राष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभेकडून भावपूर्ण श्रद्धांजली

नवी दिल्ली दि.२८ (वृत्तसंस्था)- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनाबद्दल आज देशाच्या राजकीय वर्तुळातून तीव्र शोक व्यक्त करण्यात आला. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पवार यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक कार्याचा गौरव करत त्यांना आदरांजली वाहिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची शोकसंवेदना

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, 'बारामती येथील विमान दुर्घटनेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याचे वृत्त अत्यंत क्लेशदायक आहे. त्यांचे अकाली जाणे हे राज्याच्या विकासासाठी नुकसानकारक आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीत, विशेषतः सहकारी क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान ऐतिहासिक आहे. '

पंतप्रधान नरेंद्र मोदींची श्रद्धांजली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात अजित पवार यांच्या संदर्भातील आठवणींना उजाळा दिला. पंतप्रधान म्हणाले, ''अजित पवार हे जमिनीशी जोडलेले नेतृत्व होते. महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर असणारे कष्टाळू व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखले जायचे. त्यांची प्रशासकीय कामांची जाण आणि गरिबांच्या कल्याणाची तळमळ उल्लेखनीय होती. त्यांचे निधन धक्कादायक आहे.

लोकसभेत शोकप्रस्ताव आणि आदरांजली

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अजित पवार यांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव मांडला. त्यात अध्यक्षांनी नमूद केले की, ''अजित पवार १० व्या लोकसभेचे सन्माननीय सदस्य होते. सहा वेळा उपमुख्यमंत्री आणि आठ वेळा विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर आपली पकड निर्माण केली होती. सार्वजनिक जीवनातील त्यांची बांधिलकी सदैव स्मरणीय राहील.'' यानंतर संपूर्ण सभागृहाने दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

अजित पवार यांच्या निधनाबद्दल राज्यपाल, मुख्यमंत्र्यांना तीव्र दुःख

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल राज्यपालांना तीव्र दुःखमहाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधनामुळे तीव्र दुःख झाले. दिवंगत अजित पवार यांच्या आत्म्यास ईश्वर सद्गती देवो व पवार यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य समर्थकांना हा दुखद प्रसंग सहन करण्याचे धैर्य प्रदान करो, ही प्रार्थना करतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

दमदार आणि दिलदार मित्र निघून गेला-मुख्यमंत्री फडणवीस

अजित पवार महाराष्ट्रातले लोकनेते होते आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, महाराष्ट्राच्या प्रश्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता. अजित पवार यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये मोठी आस्था होती. अजित पवार हे संघर्ष करणारे नेते होते. कुठल्याही परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारं व्यक्तिमत्व होतं. आजचा दिवस महाराष्ट्रासाठी कठीण दिवस आहे. अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्षे लागतात. महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाचं योगदान ते देत होते, त्याचवेळी त्यांचं निधन झालं ही बाब अविश्वसनीय आहे. माझ्यासाठी वैयक्तिक नुकसान झालं आहे. दमदार आणि दिलदार मित्र निघून गेला आहे. पवार कुटुंबावरही हा मोठा आघात आहे. मी आता लवकरच बारामतीमध्ये जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांनाही मी घडलेल्या परिस्थितीची कल्पना दिली आहे. या घटनेबाबत त्यांनीही प्रचंड दुःख व्यक्त केलं आहे. संपूर्ण घटनेमुळे राज्यात हळहळ पसरली आहे. कुटुंबाकडून पुढील गोष्टी ठरवण्यात येणार आहेत. सुप्रिया सुळे आणि पार्थ पवार यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. महाराष्ट्रात आज शासकीय सुटी घोषित केली आहे. तसंच तीन दिवसांचा दुखवटाही जाहीर करण्यात आला आहे अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. कधीही भरुन न निघणारं अशा प्रकारचं नुकसान आहे. महाराष्ट्रातून असे लोकनेते गेल्यावर जी पोकळी निर्माण होते ती भरुन काढणं कठीण असतं. इतक्या जवळून, इतक्या संघर्षाच्या काळात आम्ही एकत्र काम केलं आहे. अजित पवार नाहीत या गोष्टीवर विश्वास ठेवायलाच मन तयार होत नाही अशी स्थिती आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

माझा मोठा भाऊ गेल्याची भावना-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादांच्या अपघाती निधनाची बातमी अविश्वसनीय आणि धक्कादायक आहे. ते माझ्यापेक्षा अनुभवाने आणि वयानेही मोठे होते. त्यांच्या निधनाने माझा मोठा भाऊ गेल्याची भावना माझ्या मनात आहे. महाराष्ट्रासाठी आजचा काळा दिवस असून एक दूरदर्शी, स्पष्टवक्ता आणि अतिशय अभ्यासू नेता आपण गमावला आहे. महायुती सरकारमधले ते केवळ माझे सहकारी नव्हते तर माझे चांगले मित्रही होते. त्यांचं अकाली जाणं जीवाला चटका लावणारं आहे अशा भावपूर्ण शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, महाराष्ट्र त्यांना दादा म्हणून ओळखायचा आणि ते तसे होते. त्यांच्याकडे 'वेळ' साधण्याचा अप्रतिम गुण होता. त्यांच्या कामाचा झपाटा आणि निर्णयक्षमता आम्ही सगळ्यांनी अनुभवली आहे. मी केवळ सहकारी म्हणूनच नाही तरी मित्र म्हणून सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलुंना जवळून पाहिलं आहे.

अजितदादांचा अपघात कसा झाला याचं गुढ उलगडणार, विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला, फॉरेन्सिक टीमचा तपास सुरू

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूमुळे राज्यावर शोककळा पसरल्याचं चित्र आहे. मुंबईहून बारामतीकडे येताना त्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. तांत्रिक बिघाडामुळे हा विमान अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला असून फॉरेन्सिक टीम त्याचा तपास करत आहे. फॉरेन्सिक टीमच्या हाती अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडल्यामुळे हा अपघात नेमका कसा आणि का झाला याची माहिती मिळणार आहे. या विमान अपघातामध्ये सर्वजण म्हणजे, पाचही जण मृत्यूमुखी पडल्यामुळे ब्लॅक बॉक्सच्या माध्यमातून या अपघाताचा तपास करता येणं शक्य आहे.

गडचिरोली : आश्रमशाळेतील ६० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा; दोघांची प्रकृती गंभीर

गडचिरोली दि.२८ (प्रतिनिधी)- आदिवासी विकास विभागाच्या भामरागड प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या लाहेरी येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत बुधवारी अन्नातून विषबाधेचा गंभीर प्रकार घडला. शाळेतील तब्बल ६० विद्यार्थ्यांना उलट्या आणि पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. यातील ४२ विद्यार्थ्यांना भामरागड ग्रामीण रुग्णालयात, तर प्रकृती गंभीर असलेल्या दोन विद्यार्थ्यांना तातडीने अहेरी येथील महिला व बाल रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्रीचे जेवण केल्यानंतर काही विद्यार्थ्यांना अस्वस्थ वाटू ल ागले होते. मात्र, बुधवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास एकामागून एक अशा ६० विद्यार्थ्यांची प्रकृती एकाएकी बिघडली. सर्वांना मळमळ आणि तीव्र पोटदुखीचा त्रास होऊ लागल्याने शाळेतील कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली. सुरुवातीला विद्यार्थ्यांना स्थानिक लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, परंतु परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता ४२ विद्यार्थ्यांना तातडीने भामरागड येथे हलवण्यात आले. अन्नातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी वर्तविला आहे.

घटनेची माहिती मिळताच भामरागडचे प्रकल्प अधिकारी अमर राऊत, तहसीलदार किशोर बागडे आणि सहायक प्रकल्प अधिकारी रोशन चव्हाण यांनी शाळेत धाव घेतली. आरोग्य विभागाच्या चमूला पाचारण करून उर्वरित विद्यार्थ्यांचीही तपासणी सुरू करण्यात आली आहे. 'सकाळी ११ वाजेपासून विद्यार्थ्यांना त्रास जाणवू लागल्याने लागलीच उपचार सुरू करण्यात आले. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून आम्ही पूर्ण लक्ष ठेवून आहोत. या घटनेची सखोल चौकशी करण्यात येईल,' असे प्रकल्प अधिकारी अमर राऊत यांनी सांगितले.

ममता बॅनर्जी यांना घातपाताचा संशय; चौकशीची मागणी

कोलकाता दि.२८ (प्रतिनिधी)- अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूची न्यायालयाच्या देखरेखेखाली चौकशी करावी अशी मागणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली होती. त्यावर शरद पवारांनी उत्तर दिलं आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅ नर्जी यांनी अजित पवारांच्या अपघाती मृत्यूवर संशय व्यक्त करत सर्वोच्च न्यायाल याच्या देखरेखीखाली चौकशीची मागणी केली आहे. यामागे काही घातपात आहे का याता तपास केला पाहिजे असंही त्या म्हणाल्या. या आधी झालेल्या दोन अपघातांमध्ये पायलटला दोष देण्यात आला, हा सर्वात सोपा मार्ग आहे. पण या गोष्टींची चौकशी झाली पाहिजे.

जर एखाद्या वरिष्ठ राजकीय नेत्यासोबत अशी घटना घडू शकते, तर ती आपल्या व्यवस्थेच्या सुरक्षेबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित करते. अजित पवार हे एनडीएमध्ये असताना पुन्हा एकदा शरद पवारांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत होते. अशा परिस्थितीत हा अपघात झाला. देशात सध्या कुणीही सुरक्षित नाही. या अपघातामागे काही घातपात असू शकतो असा संशय त्यांनी व्यक्त केला.

मला कोणत्याही केंद्रीय तपास यंत्रणेवर विश्वास नाही, त्या पूर्णपणे सरकारच्या हातातील बाहुले आहेत. त्यामुळे अजित पवारांच्या अपघाताचा तपास हा सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली झाला पाहिजे.

विमानतळ बाजारपेठेला धुमारे

विमानतळांना विमान प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांकडून मिळणाऱ्या महसुलातूनच उत्पन्न मिळत होते. विमान थांब्याचे भाडेही उत्पन्नाचे एक साधन होते; परंतु आता वाढीचा पुढील टप्पा अधिक विमानसेवा पुरवण्याने नव्हे, तर अधिक हुशारीने विक्री करण्याने येणार आहे. भारताच्या नवीन विमान वाहतूक अर्थव्यवस्थेत आकाश ही आता मर्यादा राहिलेली नाही. तीच आता एक बाजारपेठ बनली आहे.

भारतातील विमानतळांसाठी सीट अपग्रेड आणि लाउंजसह पूरक उत्पन्न आता नफ्याचे एक प्रमुख साधन बनले आहे. ते विमानतळांना चैतन्यपूर्ण ग्राहक केंद्रांमध्ये रूपांतरित करत आहे आणि हवाई प्रवासाचे भविष्य नव्याने परिभाषित करत आहे. आता तुम्ही दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल तीनवर असाल, तर उशीर होण्याचे कारण कदाचित डिपार्चर गेट नसेल, तर नवीन शनेल बुटीक असेल. हैदराबादमध्ये विमानात चढण्यापूर्वी गॉर्डन रॅमसे बर्गर खाण्याचा मोह होऊ शकतो. संपूर्ण भारतात याच पद्धतीने विमानप्रवासाची नव्याने आखणी केली जात आहे. आता विमानप्रवास केवळ गंतव्यस्थानी पोहोचण्यापुरता मर्यादित नाही; तर प्रवासी मधल्या वेळेत तास कसे घालवतात, यालाही महत्त्व आले आहे.

भारताच्या विमान वाहतूक उद्योगासाठी आता आकाशात नाही, तर जमिनीवर सर्वात महत्त्वपूर्ण वाढ होत आहे. नॉन-तिकीट आणि गैर-विमानचालन महसूल प्रवाह हे या क्षेत्राचे सर्वात मजबूत वाढीचे इंजिन बनले. तिकीट विक्रीमुळे प्रवासी येतात; परंतु सीट अपग्रेड, लाउंज, प्रीमियम जेवण, जाहिरात, ब्रँडेड किरकोळ विक्री आणि विशेष अनुभव यांसारख्या अतिरिक्त सेवांमुळे नफ्याचे प्रमाण वाढत आहे. महसूल निर्मितीच्या पद्धतीत ही खेळी एक स्पष्ट बदल दर्शवत आहे. जागतिक स्तरावर विमान वाहतूक उद्योगाच्या नफ्यासाठी पूरक महसूल दीर्घकाळापासून महत्त्वाचा मानला जात आहे. आजघडीला हिथ्रो, चांगी आणि दुबईसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांवर ४० ते ५० टक्के महसूल नॉन-तिकीट स्रोतांमधून येतो. भारतही यात मागे नाही. विमानतळ आणि एअरलाइनच्या उत्पन्नात पूरक सेवांचे योगदान २५ ते ३५ टक्के आहे. उद्योग अंदाजांनुसार, डिजिटायझेशन आणि प्रीमियम अनुभवांची वाढती मागणी या बदलाला गती देत आहे. भारतात हा बदल दोन पातळ्यांवर होत आहे. विविध एअरलाइन्स तिकीट विक्रीपलीकडे जाऊन आपल्या सेवांचे जाळे सर्व्हिस इकोसिस्टीममध्ये रूपांतरीत करत असून विमानतळे रिटेल विक्री, खानपान सेवा आणि मीडिया यांचे हब बनत आहे.

'एअर इंडिया'मध्ये टाटा समूह करत असलेला कायापालट नवी विमाने आणि नवीन ब्रँडिंगपुरता मर्यादित नाही. ही एअरलाइन कंपनी प्रवाशांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यातून कमाई करण्यासाठी एक मजबूत पूरक सेवा पोर्टफोलिओ तयार करत आहे. पूरक महसूल आर्थिक वर्ष २०२४ मधील १,७०० कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. २०२७ पर्यंत ही विमान कंपनी 'अपग्रेड प्लस,' 'सीट अपग्रेड', अतिरिक्त सामान, भाडे लॉक, प्रवास विमा, गिफ्ट कार्डस आणि 'व्हीफएस ग्लोबल'च्या 'वनवास्को व्हिसा कॉन्सियरज'सारख्या सेवांद्वारे हा महसूल तिप्पट करण्याचे लक्ष्य ठेवत आहे. प्रवाशांना 'फ्लाय प्रायर'सारख्या सेवा आवडत आहेत. त्यामुळे जादा शुल्क देऊन त्याच दिवशी फ्लाइट बदलता येते. 'झिपअहेड'द्वारे प्राधान्य चेक-इन, टॅक्सी बुकिंगसाठी टाय-अप आणि टाटा एआयजी प्रवास विमा यांसारख्या इतर सेवा सोयीचे रूपांतर महसुलात करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. 'सीट निवडण्यापासून टॅक्सी बुकिंगपर्यंत प्रत्येक उत्पादन, ब्रँडला प्रवाशांच्या निर्णय प्रक्रियेत टिकवून ठेवते', असे एका एअरलाइन अधिकाऱ्याने सांगितले. 'इंडिगो'चा मोठ्या प्रमाणावरील फायदा दर्शवतो, की पूरक महसूल वाढ किती दूर जाऊ शकते. सध्या खासगी विमानतळे एअरलाइन्सच्या धोरणाचे अनुकरण करत आहेत. गैर-विमानचालन महसूल आता त्यांच्या व्यवसाय मॉडेलचा केंद्रबिंदू बनला आहे. दिल्ली आणि हैदराबाद विमानतळांचे संचालन करणाऱ्या जीएमआर एअरपोर्टसमध्ये गैरविमान वाहतूक (नॉन-एरो) उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ४३ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४७ टक्क्यांपर्यंत वाढले आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी वाढले. किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री, खाद्य आणि पेय (एफ अँड बी) आणि इतर सेवा या वाढीमध्ये आघाडीवर आहेत.

'भारताचे विमान वाहतूक क्षेत्र विस्ताराच्या नवीन टप्प्यात प्रवेश करत असताना आम्हाला प्रवासी वाढ आणि खर्च या दोन्हीला चालना देणारे मजबूत अनुकूल घटक दिसत आहेत,' असे 'जीएमआर एअरपोर्टस'चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (वाणिज्य आणि विकास) राजेश अरोरा यांनी सांगितले. आम्ही केवळ पायाभूत सुविधांचे संचालक या भूमिकेतून विकसित होऊन एक वैविध्यपूर्ण ग्राहक मंच बनलो आहोत आणि विमानतळांना मूल्य प्रदान करणाऱ्या गंतव्यस्थानांमध्ये रूपांतरित केले आहे, असे ते म्हणाले. आठ विमानतळांचे संचालन करणाऱ्या 'अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड'ने (एएएचएल) आर्थिक वर्ष २०२५ मध्ये गैरविमान वाहतूक महसुलातून चार हजार ९२६ कोटी कमावले. हे उत्पन्न 'अदानी एअरपोर्टस'च्या एकूण उत्पन्नाच्या जवळपास निम्मे आहे. एप्रिल मून रिटेल आणि मुंबई ट्रॅव्हल रिटेलसारख्या उपकंपन्या विस्तारणाऱ्या इन-हाऊस किरकोळ विक्री मॉडेलला चालना देत आहे. अदानी समूह विविध टप्प्यांमधील शहरस्तरीय प्रकल्पांमध्ये चार अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करत आहे. त्यापैकी जवळपास ७० टक्के रक्कम मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांसाठी राखून ठेवण्यात आली. यामध्ये प्रवासी, कर्मचारी आणि शहरातील ग्राहकांना सेवा देणाऱ्या वैयक्तिकृत, डेटा-आधारित किरकोळ व्यवसायावर भर दिला जात आहे.

'आम्ही संपूर्ण विमानतळ व्यवसायाचा ताबा घेण्याची आणि सर्व किरकोळ व्यवसाय स्वतःच चालवण्याची योजना आखत आहोत', असे 'अदानी एअरपोर्ट'चे सीईओ गौरव सिंग यांनी सांगितले. बंगळूरुचे केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ चालवणाऱ्या 'बंगळूरु इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड'साठी महसुलाच्या ३५ टक्के वाटा 'नॉन-एरो' व्यवसायातून येतो. त्यात 'एफ अँड बी' लाउंज, किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री आणि जाहिरातींचा समावेश आहे. कंपनी पुढील पाच वर्षांमध्ये आपल्या किरकोळ व्यवसायाचा विस्तार ४० हजार चौरस मीटरवरून एक लाख चौरस मीटरपर्यंत वाढवण्याची आणि ५०० हून अधिक ब्रँड्स जोडण्याची योजना आखत आहे.

बुवाबाजी : आंबेडकरी विवेकाचा पराभव की सामाजिक आत्महत्या?

भारतीय समाजाच्या इतिहासात अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक समस्या राहिलेली नाही; ती सत्ता, अर्थकारण आणि मानसिक गुलामी यांचे सर्वात प्रभावी साधन बनली आहे. विज्ञान, शिक्षण आणि लोकशाही यांच्या युगातही बुवाबाजी टिकून आहे, याचा अर्थ समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केला असला तरी विवेकाचा स्वीकार केलेला नाही. विदर्भातील विक्तूबाबा ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती संपूर्ण समाजाच्या वैचारिक अपयशाची आरसेदर्शी कहाणी आहे. विदर्भातील मोठ्या बाबांपैकी एक म्हणजे विक्तूबाबा. नागपूर जिल्ह्यात त्याचे भव्य देवस्थान उभे आहे. आज हे देवस्थान कोट्यधीश बनले आहे. पण या देवस्थानामागील वास्तव वेगळे आहे. वास्तविक पाहता विक्तूबाबा हा मानसिकदृष्ट्या अपंग मुलगा होता. वयात आल्यानंतर स्त्रिया दिसल्या की चावायला धावायचा; म्हणून त्याच्या नातेवाईकांनी त्याच्या हातापायात बेड्या घातल्या. हाच पुढे बेडीवाले-विक्तूबाबा म्हणून प्रसिद्ध झाला. दलित समाजामध्ये या बाबाला फार मानाचे स्थान मिळाले आणि प्रचंड जनसमुदाय त्याच्यावर श्रद्धा ठेवू लागला. एका मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीला देवत्व देणे, त्याच्या विकृतीला चमत्काराचे रूप देणे आणि त्याच्या नावावर कोट्यवधी रुपयांचे देवस्थान उभे राहणे हे श्रद्धेचे नव्हे, तर विवेकाच्या पराभवाचे लक्षण आहे. समाजाने जेव्हा प्रश्न विचारणे थांबवले, तेव्हा बुवाबाजी जन्माला येते. बुवाबाजी ही अंधश्रद्धेची आधुनिक आवृत्ती आहे. ती देवाच्या नावाने नव्हे, तर माणसाच्या नावाने चालते म्हणूनच ती अधिक धोकादायक आहे. बुद्धांचा विचार याच बुवाबाजीच्या मुळावर घाव घालणारा आहे.

बालपणी मी स्वतः विक्तूबाबाला पाहिले आहे. सतत घाणेरड्या शिव्या देणारा, हातापायात बेड्या असणारा हा बाबा; ज्याच्या भोवती भक्तांचा गराडा असायचा. त्याच्या प्रत्येक पागल हावभावाचा भक्त आपापल्या परीने अर्थ काढायचे. मोठ्या प्रमाणावर पेढे, नारळ, पैसे बाबाला वाहिले जायचे आणि त्याच वस्तू पुन्हा दुकानांत विक्रीला ठेवण्यात यायच्या. टी.बी., महारोग आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे रुग्णही विक्तूबाबाकडे येताना मी पाहिले. त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधल्यावर बाबाच्या कृपेने रोग बरे होतात. हा केवळ विश्वास नव्हे, तर अनुभव असल्याचा दावा ऐकून मी स्तब्ध झालो. कारण विक्तूबाबांची आई महारोगाची रुग्ण होती आणि ती बाबा आमटेंच्या दवाखान्यात दीर्घकाळ उपचार घेत होती. विक्तूबाबाच्या घाणेरड्या शिव्यांतूनही 'चांगला अर्थ' काढण्याचा भक्तांचा अट्टाहास विलक्षण होता. काही भक्त तर मुद्दाम बाबाला त्रास देत, जेणेकरून त्याने शिव्या द्याव्यात. त्या शिव्या मोजून काही लोक सट्टा-जुगार लावत असत. हा प्रकार केवळ हास्यास्पद नव्हे, तर समाजाच्या मानसिक अधःपतनाचे प्रतीक होता. आजही काही लोक लग्नाची पत्रिका समाजात वाटण्यापूर्वी विक्तूबाबाच्या चरणी ठेवतात. हा केवळ श्रद्धेचा प्रश्न नाही; तो मानसिक गुलामीचा पुरावा आहे. जीवनातील प्रत्येक निर्णय स्वतःच्या बुद्धीने घेण्याऐवजी बाबाच्या आशीर्वादावर अवलंबून राहणे म्हणजे विवेकाचा त्याग होय.

बुद्धाने सांगितले ङ्कअत्त-दीप-भवङ्क, म्हणजे स्वतःचा दिवा व्हा. पण आजचा समाज म्हणतो, ङ्कबाबाचा दिवा व्हा.ङ्क हा फरक केवळ शब्दांचा नाही; तो मानसिकतेचा आहे. बुद्धधम्माचा अर्थ देव बदलणे नव्हे, तर विचार बदलणे आहे. जो समाज बुद्धाचा धर्म स्वीकारूनही चमत्कार शोधतो, तो बुद्धाचा नाही, तर बुवांचा अनुयायी ठरतो. म्हणूनच बुवाबाजी ही केवळ धार्मिक समस्या नाही; ती बुद्धविचाराच्या पराभवाची चिन्हे आहेत. जर बुद्धाचा विचार खरोखर स्वीकारायचा असेल, तर बुवाबाजीला केवळ विरोध करणे पुरेसे नाही; तिच्या मुळावरच घाव घालावा लागेल. कारण बुद्धाचा मार्ग स्पष्ट आहे, श्रद्धेपासून विवेकाकडे, देवापासून मानवाकडे आणि चमत्कारापासून विज्ञानाकडे. बुद्धाने देव, चमत्कार आणि अंधश्रद्धा यांना थेट आव्हान दिले. कोणत्याही गोष्टीवर केवळ परंपरेमुळे, धर्मामुळे किंवा कोणाच्या सांगण्यामुळे विश्वास ठेवू नका; स्वतःच्या बुद्धीने तपासून पाहा हा बुद्धाचा मूलमंत्र होता. त्यामुळे बुद्धधम्म हा पूजा, कर्मकांड किंवा बाबागिरीचा धर्म नाही, तर विवेक, अनुभव आणि तर्काचा धर्म आहे. बुद्धाने सांगितले की दुःखाचे कारण बाहेर नाही; ते आपल्या आत आहे. त्यामुळे दुःखावर उपाय शोधताना देव, बाबा किंवा चमत्कार शोधण्याची गरज नाही; गरज आहे ती स्वतःच्या बुद्धीची. विडंबन असे की बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच बुवाबाजी फोफावली आहे. बुद्धाच्या नावाने धर्म स्वीकारणारा समाज बाबांच्या चरणी नतमस्तक होतो ही केवळ विसंगती नाही; ती बुद्धविचाराची विटंबना आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत; त्यांनी त्याला विचार करण्याची शक्ती दिली. बाबासाहेबांचा धर्म हा देवाचा नव्हे, तर माणसाचा धर्म होता. बुद्धधम्म स्वीकारताना त्यांनी स्पष्ट सांगितले, श्रद्धा नव्हे, बुद्धी. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि देववाद यांना स्पष्ट नकार दिला. पण आज प्रश्न उभा राहतो. आपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत की त्यांच्या नावावर जगणारे भक्त? हजारो घरांमध्ये बाबासाहेब आंबेडकर आणि विक्तूबाबांचे फोटो शेजारी लावलेले दिसतात. हा केवळ प्रतीकात्मक विरोधाभास नाही; तो वैचारिक शून्याचा पुरावा आहे. दीक्षाभूमी ही केवळ भूभाग नाही; ती विवेकाची क्रांती आहे. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी लाखो लोकांना अंधश्रद्धेपासून मुक्त केले, त्याच भूमीवर विक्तूबाबाचा सत्कार होणे म्हणजे बुद्धिवादाची सार्वजनिक हत्या आहे. याविरोधात मोजकेच बुद्धिवादी आवाज उठले; बहुसंख्य आंबेडकरी नेते मात्र गप्प राहिले. का? कारण भक्तांचा रोष, मतांचा तोटा आणि राजकीय नुकसान. इथे प्रश्न उभा राहतो राजकारणासाठी विवेकाचा बळी देणे ही आंबेडकरी चळवळ आहे का? जर हो, तर बाबासाहेबांचा विचार केवळ निवडणूक घोषणापत्रापुरता मर्यादित राहिला आहे, हे स्वीकारावे लागेल.

विक्तूबाबाचे देवस्थान आज कोट्यधीश आहे. हजारो भक्त दरवर्षी दर्शनाला येतात. नारळ, पेढे, पैसे, वस्त्र, दान या सगळ्यांतून एक प्रचंड अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. बुवाबाजी ही आज केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक उद्योग बनली आहे. प्रश्न असा आहे हा पैसा कुठून येतो? तो येतो गरीब, असुरक्षित आणि असहाय लोकांकडून. जेव्हा राज्य त्यांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगार देण्यात अपयशी ठरते, तेव्हा ते बाबांकडे धाव घेतात. म्हणजेच बुवाबाजी ही व्यवस्थेच्या अपयशाची उपज आहे. टी.बी., कॅन्सर, महारोग यांसारख्या रोगांवर बाबाच्या कृपेने उपचार होतात, असा विश्वास म्हणजे विज्ञानाचा अपमान आहे. पण या विश्वासामागे असलेली मानसिकता अधिक धोकादायक आहे, ङ्कआपण स्वतः काही करू शकत नाही, कोणीतरी चमत्कार करावा लागेल.ङ्क ही मानसिकता म्हणजेच मानसिक गुलामी.

सामान्यतः अंधश्रद्धा ही ग्रामीण समाजाशी जोडली जाते. पण दलित समाजात तिचे अस्तित्व अधिक खोलवर आहे. कारण दलित समाजाने ऐतिहासिकदृष्ट्या सतत अपमान, शोषण आणि अन्याय सहन केला आहे. त्यामुळे त्याच्या मनात असुरक्षितता, भीती आणि आश्रयाची गरज निर्माण झाली आहे. बुवाबाजी ही त्या मानसिकतेचा परिणाम आहे. बाबासाहेबांनी दलित समाजाला मानसिक गुलामीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. पण सामाजिक चळवळ दुर्बल झाल्यामुळे ती गुलामी नव्या रूपात परत आली, बुवाबाजीच्या रूपात. आज आंबेडकरी चळवळ राजकीयदृष्ट्या सक्रिय आहे. निवडणुका, मोर्चे, सभा, घोषणा सगळे सुरू आहे. पण सामाजिक चळवळ मात्र निष्प्रभ झाली आहे. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर सामाजिक परिवर्तनाची मशाल कोणीच उचलली नाही. परिणामी, बाबासाहेबांचा फोटो सर्वत्र दिसतो; पण त्यांचा विचार समाजात दिसत नाही. आंबेडकरी चळवळ जर खरोखरच बाबासाहेबांची वारसदार असती, तर बुवाबाजीविरोधात ती सर्वात पुढे उभी राहिली असती. पण वास्तव उलट आहे. बुवाबाजीवर टीका केली की ङ्कभावना दुखावतातङ्क असा युक्तिवाद केला जातो. प्रश्न असा आहे, भावना जपायच्या की विवेक?

बुद्धाने सांगितले काहीही अंधश्रद्धेने स्वीकारू नका. बाबासाहेबांनी त्याच विचाराला आधुनिक संदर्भ दिला. पण आज बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच अंगात येणारे बुद्ध, अंगात येणारे बाबासाहेब दिसतात. हा विरोधाभास केवळ हास्यास्पद नाही; तो धोकादायक आहे. कारण जेव्हा विचाराऐवजी चमत्कार महत्त्वाचा ठरतो, तेव्हा समाज पुन्हा मध्ययुगात परत जातो. प्रश्न विक्तूबाबाचा नाही; प्रश्न आपला आहे. विक्तूबाबा ही समस्या नाही; समस्या म्हणजे त्याला देवत्व देणारा समाज. विक्तूबाबा उद्या नाहीसा झाला, तरी उद्या दुसरा बाबा तयार होईल. कारण समाजाची मानसिकता बदललेली नाही. जो समाज बाबासाहेबांच्या नावाने राजकारण करतो, तोच समाज बुवांच्या चरणी नतमस्तक होतो, हा विरोधाभास केवळ वैचारिक नाही, तर नैतिकही आहे. आज समाजासमोर प्रश्न स्पष्ट आहे, आपण बाबासाहेबांच्या बाजूने उभे राहणार की बुवांच्या? बाबासाहेब म्हणजे प्रश्न विचारण्याची परंपरा. बुवा म्हणजे प्रश्न न विचारण्याची गुलामी. बाबासाहेब म्हणजे विज्ञान, तर्क आणि मानवतावाद, बुवा म्हणजे चमत्कार, अंधश्रद्धा आणि भीती. दोन्ही एकत्र चालू शकत नाहीत.

आता वेळ आली आहे की आंबेडकरी समाजाने आत्मपरीक्षण करावे. बाबासाहेबांचे फोटो घरात लावणे पुरेसे नाही; त्यांचा विचार जीवनात उतरवावा लागेल. जर तुमच्या घरात बुवाचा फोटो आहे, तर बाबासाहेबांचा फोटो केवळ सजावटीचा आहे, हे स्वीकारावे लागेल. जर तुम्ही बुवांच्या चरणी नतमस्तक होता, तर बाबासाहेबांच्या विचारांशी तुम्ही द्रोह करत आहात, हे मान्य करावे लागेल. आज गरज आहे ती निर्भीड वैचारिक क्रांतीची. बुवाबाजी विरोधात उभे राहणे म्हणजे धर्मविरोध नाही; ते मानवतावादाचे समर्थन आहे. अंधश्रद्धेविरोधात बोलणे म्हणजे समाजविरोध नाही; ते समाजाच्या मुक्तीसाठीचे युद्ध आहे. जर आंबेडकरी समाजाने आता प्रश्न विचारले नाहीत, तर भविष्यात बाबासाहेबांचा विचार केवळ पुस्तकांमध्ये उरेल आणि बुवाबाजी समाजावर राज्य करेल. म्हणूनच आजच निर्णय घ्या, देव नव्हे, विचार स्वीकारा! चमत्कार नव्हे, विज्ञान स्वीकारा! बुवा नव्हे, बाबासाहेब स्वीकारा! कारण विवेक हीच खरी क्रांती आहे आणि विवेकाशिवाय कोणतीही मुक्ती शक्य नाही !

– प्रविण बागडे

चांदीच्या ईटीएफमध्ये विक्रमी वाढ परंतु हिंदुस्थान झिंक शेअर्समध्ये ३% घसरण

नवी दिल्ली, दि. २८ (वृत्तसंस्था) – एकीकडे दिवसेंदिवस मेटल शेअर्समध्ये वाढ होत असताना आज हिंदुस्थान झिंक शेअर्समध्ये मात्र ३% घसरण झाली आहे.दुसरीकडे चांदीच्या ईटीएफमध्ये रेकोर्ड ब्रेक वाढ झाली असताना अनिल अग्रवाल यांच्या कंपनीच्या शेअर्समध्ये मात्र ३% पातळीवर घसरण झाली आहे. अनिल अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या उद्योगसमुहाने आपल्या हिंदुस्थान झिंक या उपकंपनीतील १.५९% हिस्सा (भागभांडवल Stake) विकण्याचा निर्णय घेतल्याने गुंतवणूकदारांनी तेजीतही आज नकारात्मक कौल दिला आहे. ओएफएस (Offer for sale OFS) अंतर्गत या समभागांच्या विक्रीची घोषणा कंपनीने एक्सचेंज फायलिंगमध्ये केली होती. ६८५ रूपये प्रति शेअरसह हा सौदा कंपनीने निश्चित केला. ज्यामध्ये खरेदीदारांना ६% सवलतीसह ही फ्लोअर प्राईज ऑफर करण्यात आली होती. त्यामुळे ४५८९.५० रूपये प्रति शेअरसह हा सौदा होणार आहे.

या सौद्यानंतर कंपनीच्या शेअर्समध्ये ३% घसरण झाली जेव्हा सिल्वर ईटीएफमध्ये नव्या उच्चांकावर झेप घेतली गेली आहे. काल ७ ते ८% वाढीनंतर जागतिक अस्थिरतेत चांदीच्या दरात जगभरात आणखी ८.६७% वाढ झाली ज्यामध्ये आज चांदी प्रति किलो ३८०००० रूपयांच्या घरात पोहोचली.

एकीकडे वाढलेली औद्योगिक मागणी व अस्थिरतेत स्थिर सुरक्षित गुंतवणूक म्हणून चांदीला प्राधान्य गुंतवणूकदारांकडून दिले जात असताना मोठ्या प्रमाणात महिन्यात केवळ सिल्वर नाही तर मेटल शेअर्समध्ये सातत्याने वाढ होत आहे. अशातच ही चांदीत विक्रमी वाढ झालेली असताना मात्र हिंदुस्थान झिंक शेअर्समध्ये आज मोठी घसरण झाली आहे. सकाळी ११.५२ वाजता शेअर ०.२३% घसरत ७२५.५० रूपयांवर व्यवहार करत होता. गेल्या तीन दिवसात चांदीच्या दरात ४५००० रूपयांची वाढ झाली आहे. हिंदुस्थान झिंक शेअर्समध्ये गेल्या ५ दिवसात ५.१८% वाढ झाली असून गेल्या महिनाभरात १७.२९% वाढ झाली असून संपूर्ण वर्षभरात शेअर्समध्ये ६७.४७% वाढ झाली आहे. तर इयर टू डेट बेसिसवर शेअर्समध्ये १८.५६% वाढ झाली आहे.

अभिनेत्री ममता कुलकर्णीची किन्नर आखाड्यातून हकालपट्टी

नवी दिल्ली, दि. २८ (वृत्तसंस्था) – प्रयागराज महाकुंभमधील सर्वात मोठा धार्मिक वाद अखेर टोकाला पोहोचला आहे. ज्योतिषपीठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यावर टीका करणाऱ्या अभिनेत्री ममता कुलकर्णी (यामाई ममता नंद गिरी) हिची 'किन्नर आखाड्या'तून हकालपट्टी करण्यात आली आहे. आखाड्याच्या प्रमुख आचार्य महामंडलेश्वर डॉ. लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी एका व्हिडिओ संदेशाद्वारे या निर्णयाची अधिकृत पुष्टी केली. त्रिपाठी म्हणाल्या की, 'आखाड्याच्या सर्व पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आम्ही हा निर्णय घेतला आहे. आता ममता कुलकर्णीशी आखाड्याचा कोणताही संबंध नाही. ती आता आखाड्याची अधिकारी किंवा सदस्य नाही. आमच्या आखाड्यात महिला, पुरुष आणि किन्नर सर्व आहेत. आम्हाला कोणताही वाद नको आहे.

तसेच मौनी अमावस्येच्या दिवशी ज्या प्रकारे बटुक ब्राह्मणांना शिखा धरून मारहाण झाली, त्याबद्दलही आमची तीव्र नाराजी आहे.' याआधी २५ जानेवारी रोजी ममता कुलकर्णीने शंकराचार्य वादावर बोलताना खळबळजनक विधान केले होते. ती म्हणाली होती की, '१० पैकी ९ महामंडलेश्वर आणि तथाकथित शंकराचार्य खोटे आहेत आणि त्यांना शून्य ज्ञान आहे.' याशिवाय तिने शंकराचार्यांना दोन रोखठोक प्रश्न विचारले होते. यामध्ये त्यांची शंकराचार्य पदी नियुक्ती कोणी केली? व कोट्यवधींच्या गर्दीत पालखी घेऊन निघण्याची काय गरज होती? यावरून ही कारवाई झाली आहे.

माझी हकालपट्टी नाही, तर राजीनामा दिलाय

आखाड्यातून काढल्याच्या वृत्तावर ममता कुलकर्णीने वेगळाच दावा केला आहे. ती म्हणाली, 'मी महामंडलेश्वर पदाचा राजीनामा दिला आहे. खरे तर महामंडलेश्वर पद हे अनेक वर्षांच्या आध्यात्मिक तपस्येतून मिळते. मी पाहिलेय की, खरा महंत किंवा महामंडलेश्वर होण्यासाठी अनेक वर्ष ध्यान आणि शिस्तीतून जावे लागते.

नांदेड विभाग आपल्या उत्कृष्ट कामगिरीसह सातत्यपूर्ण प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर आहे- डी.आर.एम. श्री कामले

नांदेड रेल्वे विभागात ७७ वा गणतंत्र दिवस उत्साहात साजरा

नांदेड, दि. २८ (प्रतिनिधी) – नांदेड रेल्वे विभागीय कार्यालय, दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड येथे दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा गणतंत्र दिवस अत्यंत उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नांदेड यांनी सकाळी राष्ट्रीय ध्वज फडकावून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी रेल्वे सुरक्षा बल (RPF) च्या जवानांनी शिस्तबद्ध व देखणी परेड सादर केली. या परेडचे निरीक्षण विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी केले. कार्यक्रमास श्री राजेंद्र कुमार मीना, अप्पर विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नांदेड, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसह दक्षिण मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना, नांदेडच्या अध्यक्षा सौ. प्रंधन्या कामले यांची उपस्थिती होती.

परेडनंतर आपल्या भाषणात श्री प्रदीप कामले यांनी गणतंत्र दिनाच्या शुभेच्छा देत नांदेड मंडलाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की गणतंत्र दिवस हा संविधान स्वीकारण्याचा दिवस असून तो आपल्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव करून देतो. नांदेड मंडल आपल्या उत्कृष्ट कामगिरीसह सातत्यपूर्ण प्रगतीच्या मार्गावर अग्रसर आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. सन २०२५-२६ या वर्षात नांदेड मंडलाने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. परिचालन विभागाने एक्सप्रेस गाड्यांसाठी ३१ वेळा १०० % टक्के वेळपालन साध्य केले असून मागील वर्षाच्या तुलनेत ही मोठी सुधारणा आहे. नांदेड-मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेसच्या विस्तारा सह एकूण ४ नवीन गाड्यांची सुरूवात करण्यात आली आहे. वाणिज्य विभागाने तिकीट तपासणी मोहिमांद्वारे रू. १४ कोटींहून अधिक महसूल मिळवला असून नांदेड मंडल दक्षिण मध्य रेल्वेमध्ये लक्ष्य ओलांडणारा एकमेव मंडल ठरला आहे. अढतच मशिनद्वारे एकूण तिकीट विक्रीपैकी सुमारे ६० टक्के तिकीट विक्री होत असून ही कामगिरी दक्षिण मध्य रेल्वेमध्ये सर्वाधिक आहे.

अभियांत्रिकी विभागाने परभणी-जालना, परळी-परभणी व पूर्णा-अकोला विभागांमध्ये सेक्शनल वेग ११० किमी प्रतितास करण्यात वाढ केली असून कायमस्वरूपी वेग निर्बंध हटवून प्रवासी व मालगाडी संचालन अधिक सुरक्षित व सुरळीत केले आहे. ट्रॅक देखभाल व डीप स्क्रिनिंगच्या कामांमुळे प्रवासाची गुणवत्ता अधिक सुधारली आहे. याशिवाय विद्युत, सिग्नल व दूरसंचार, यांत्रिक, कार्मिक, सुरक्षा, भंडार व लेखा विभागांनीही उत्कृष्ट कार्य करत मंडलाच्या एकूण प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. यावेळी श्री प्रदीप कामले यांनी SCRWWO नांदेडच्या अध्यक्षा सौ. प्रंधन्या कामले यांच्या नेतृत्वाखाली महिला कल्याण संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व कल्याणकारी उपक्रमांचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की अधिकारी व कर्मचारी यांच्या समर्पणामुळेच नांदेड मंडल ही भरीव प्रगती साध्य करू शकले आहे.

श्री राजेंद्र कुमार मीना, अप्पर विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी श्री अरुण कुमार जैन, महाव्यवस्थापक, दक्षिण मध्य रेल्वे यांचा गणतंत्र दिवसाचा संदेश उपस्थितांना वाचून दाखविला.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला 'अर्थयोग' ग्रंथाचा विमोचन सोहळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि. २८ (प्रतिनिधी)- जनमनासात अर्थभान अंत्यत सोप्या व मराठी भाषेत रुजवण्याचा ध्यास घेणारे डॉ. डी. एस पाटील लिखीत 'अर्थयोग' या ग्रंथाचा विमोचन सोहळा छत्रपती संभाजीनगर मध्ये दि.२५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वा. सुप्रसिध्द कांदबरीकार व सातारा येथील आखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. विश्वास पाटील यांच्या हस्ते देश निष्ठे प्रेरित वातावरणात प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला संपन्न झाला झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मा.डॉ. पुरुषोत्तम भापकर (माजी आयुक्त), श्री. शेषराव चव्हाण (आंतरराष्ट्रीय दर्जाचे लेखक), श्री. फुलचंद नागटिळक (प्रति गाडगेबाबा व सिनेअभिनेता), डॉ. महेश खरात (अध्यक्ष, मुक्त सृजन संस्था) व श्री. विलास फुटाने (अदित्य प्रकाशन) हे उपस्थित होते. या सोहळ्यास सर्वच क्षेत्रातील मान्यवर आर्वजून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विलास फुटाने यांनी केले 'अर्थयोग' पुस्तकात नमूद केलेल्या काही बाबींचे संदर्भ त्यांनी प्रस्तावणे मध्ये दिले, या ग्रंथाचे लेखक डॉ.डी.एस. काटे हे अभियंता असतांना सुध्दा विविध दैनिकात त्यांनी अर्थजागृतीवर ६०० पेक्षा अधिक लेख लिहले व तद्नंतर अर्थदिशा, अर्थसंपदा, अर्थजागर, अर्थनिती असे ४ ग्रंथ यापुर्वी लिहले आहेत व आता 'अर्थयोग' हा ग्रंथ नव्याने वाचकांसाठी आणला आहे. डॉ. महेश खरात यांनी लेखकाविषयी आपल्या भाषणात असे म्हटले कि, डॉ. काटे यांचे व्यक्तीमत्व ज्या भिंगातून आपण पाहु तसेंच आहे. श्री. फुलचंद नागटिळक म्हणाले कि, अर्थ जीवनाला असला पाहिजे, अर्थ जगण्याला असला पाहिजे, अर्थनियोजनाची दूरदूष्टी असल्याशिवाय कुठलीही व्यक्ती आयुष्यात यशस्वी होऊ शकत नाही. आलेला पैसा कसा टिकवायाचा व वाचवयाचा याचे ज्ञान असणे अंत्यत आवश्यक आहे. आज वाचवलेला १ रुपया उद्या तुमचा ऑक्सीजन होऊ शकतो. श्री. शेषराव चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ. काटे यांनी अभियंता व अर्थशास्त्र याचे कॉम्बीनेशन करुन 'अर्थयोग' या ग्रंथाची माहिती सामान्य नागरिकांना सहज उमजेल व कळेल अशी करुन दिली आहे. 'अर्थयोग' चे लेखक डॉ. काटे यांनी आपले विचार मांडतांना असे म्हटले कि, भारतीय संविधानाने कितीही पैसा कमविण्याची मुभा दिली आहे, मात्र कमविला जाणारा पैसा हा वाममार्गाने कमविला गेला नाही पाहिजे. रुपायाची किंमत काय असते याचे उदाहरण ग्रंथात नमूद केलेल्या एका धड्यावरुन त्यांनी दिले, जगात फुकट काहीच मिळत नाही, मी कसा घडलो याचे सुध्दा त्यांनी काही उदाहरणे दिली. 'अर्थयोग' मध्ये अर्थनीती, वित्तीय व्यवहार, सामाजीक लेख, पैसाविषयक, विशेष लेख, व्यक्तीगत भावना अशा वेगवेगळ्या बाबींचे संदर्भ आलेले आहेत. डॉ. काटे यांचा 'मी रुपया बोलतो' असा पहिला लेख वर्तमानपत्रात प्रकाशीत झाल्यानंतर अर्थविषयक ग्रंथ लिहण्याचे त्यांचे धाडस निर्माण झाले. मार्केटिंगच्या जाळ्यात न फसणे, लालसा व गरजा मर्यादित ठेवावी. आपल्या मुलांना बँक व्यवहार व अर्थज्ञान शिकवने याचा आवर्जून उल्लेख डॉ. काटे यांनी केला. पैश्याचा पाऊस पडत नसतो, तो चांगल्या नितीमूल्यानेचे येतो. मल्टीमार्केटिंग व फसव्या स्किमपासून दूर राहावे. सध्याच्या परिस्थतीत श्वासा एवढे महत्व पैश्याला सुध्दा आले आहे. डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना मी सुध्दा अर्थशास्त्राचा विद्यार्थी आहे मात्र जेवढे अर्थज्ञान डॉ. काटे यांना कळले तेवढे मात्र मला कळाले नाही. डॉ. काटे यांनी या ग्रंथात मांडलेले मुद्दे प्रक्टीकली असुन कुठल्याही जनमानसाला कळले असेच आहे. प्रत्येक माणसाच्या जीवनात शरीरशात्र व अर्थशास्त्र अंत्यत महत्वाचे आहे. डॉ. विश्वास पाटील यांनी आपल्या अध्यक्षपर व खुमसदार भाषणात 'अर्थयोग' ग्रंथाच्या विविध पैलूंचा उलगडा केला. मराठी भाषेत 'अर्थयोग' ग्रंथ प्रकाशीत होणे म्हणजे मायमराठीला सोन्याचे दिवस आले म्हणून समजा, या ग्रंथामुळे सामान्य मानसाला अर्थनितीचा स्तर नक्कीच कळेल. अधिक पैसा जवळ आल्यास माणसात अहंकार वाढतो, मात्र वेळेकाळाप्रमाणे पैश्याचे मुल्य बदलत असते हे विसरु नये. जीवनात संघर्षाबरोबर आर्थीक ज्ञान असणे सुध्दा गरजचे आहे. रुपयाच्या घसरणाबरोबर आजकाल माणसा माणसा मध्ये सुध्दा स्पर्धा सूरु झाली आहे. पैश्याचा उपयोग चांगल्या कामाबरोबर वाईट कामासाठी सुध्दा वापरला जाऊ लागला आहे. डॉ. काटे यांनी अर्थकारणाची भाषा पकडल्यामुळे या पुस्तकाचे वैभव वाढले आहे. सरकारने जीएसटीचा मोठा अतिरेक करुन मरणावर सुध्दा जीएसटी लावला आहे. कुठलाही ग्रंथ लिहतांना त्या विषयाचा भाग व्हावे लागते तरच ग्रंथ आगळावेगळा होता. डॉ. विश्वास पाटील यांच्या भाषणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली, प्रा. विष्णू सुरासे यांनी आभार मानले.

राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामांत अंत्यसंस्कार होणार

मुंबई, दि. २८ (प्रतिनिधी) - राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित आशाताई अनंतराव पवार यांचे आज दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले आहे. यामुळे महाराष्ट्रात २८ ते ३० जानेवारी २०२६ या तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असे सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) विभागामार्फत कळिवण्यात आले आहे.

या तीन दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल. तसेच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नयेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये बंद राहतील, असे कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणातील काळा दिवस!

अजितदादा गेले यावर विश्वासच बसत नाही. काय बोलावे तेच सुचत नाही. मन अक्षरशः सुन्न झाले आहे. अजितदादांच्या निधनाने आम्हा कार्यकर्त्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आजचा बुधवार हा महाराष्ट्राच्या राजकारणातील काळा दिवस ठरला आहे. सातत्याने विकासाचा ध्यास घेतलेल्या या नेतृत्वाचा अशा प्रकारे अंत व्हावा ही खुपच दुर्दैवी घटना आहे. दादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणाचे अतोनात नुकसान झाले आहे. पिंपरी चिंचवडच्या बाबतीत सांगायचे झाल्यास त्यांच्या निधनाने या भागातील विकासाला चालना देणारा आधारवड कोसळला आहे.

– विठ्ठल नाना काटे,
नवनिर्वाचित नगरसेवक, पिंपळे सौदागर.

राजकीय क्षेत्रातील फार मोठी हानी !

अजितदादांचे निधन अतिशय अनपेक्षित आणि धक्कादायक. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचा नेता गेला. विकासाची दृष्टी असलेले आणि सर्वसामान्य जनतेसाठी झटणारे नेतृत्व आपल्यातून निघून जाणे ही एकुणच राजकीय क्षेत्रातील फार मोठी हानी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!

– डॉ. कुंदाताई भिसे
नगरसेविका, पिंपळे सौदागर

आदिशक्ती ग्रामीण व शहरी महिला विकास संस्थेचा हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि. २८ (प्रतिनिधी) - प्रभाग क्र. २ मध्ये आदिशक्ती ग्रामीण व शहरी महिला विकास संस्था व महिला बचत गटाच्या वतीने मकर संक्रांतीनिमित्त संक्रांत मिलन व हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून नव्याने निवडून आलेल्या महिला नगरसेविका सौ. पुष्पाताई रोजतकर व सौ. सुवर्णाताई साळवे उपस्थित होत्या. तसेच नगरसेवकांच्या अर्धांगिनी सौ. शुभांगी राज गौरव वानखेडे व सौ. स्वाती किशोर नागरे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस आदिशक्ती ग्रामीण व शहरी महिला विकास संस्थेच्या अध्यक्षा सौ. राधा विवेक देवरे यांच्या हस्ते नवनिर्वाचित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी महिला बचत गटाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

या कार्यक्रमास बचत गटाच्या सचिव सौ. दुर्गा सचिन जाधव, आदिशक्ती महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ. अंजली जाधव, सचिव सौ. सविता शिदोरे, खजिनदार सौ. अश्विनी गोंधळे यांच्यासह गटातील महिला सदस्य व परिसरातील अनेक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमात हळदी-कुंकू, विविध खेळ, रांगोळी व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांचा रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. या उपक्रमातून महिलांच्या एकजूट, सक्षमीकरण व आत्मनिर्भरतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदिशक्ती महिला बचत गटाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

घंटागाड्यांचे 'रूट मॅपिंग' आणि कर वसुली प्रणालीची बीदर शिष्टमंडळाकडून पाहणी; छत्रपती संभाजीनगरच्या मॉडेलचे कौतुक



छत्रपती संभाजीनगर दि. २८ (प्रतिनिधी)- 'स्वच्छ भारत मिशन २.०' अंतर्गत क्षमता बांधणी कार्यक्रमासाठी कर्नाटक राज्यातील बीदर महानगरपालिकेच्या शिष्टमंडळाने आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी कार्यालयाला भेट दिली. याप्रसंगी बीदरचे महानगरपालिका आयुक्त मुकुल जैन यांनी छत्रपती संभाजीनगरचे महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांची भेट घेतली. यावेळी जी. श्रीकांत यांनी बीदरच्या आयुक्तांना शहराच्या विकासकामांचे आणि प्रशासकीय नियोजनाचे धडे दिले. स्मार्ट सिटीचे डेप्युटी सीईओ रवींद्र जोगदंड यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

या दौऱ्यात बीदरच्या शिष्टमंडळाने प्रामुख्याने शहरातील घंटागाड्यांचे 'रूट मॅपिंग' आणि त्यांचे नियंत्रण कक्षातून केले जाणारे मॉनिटरिंग याबद्दल विशेष रस दाखवला. नागरिकांना स्वतःच्या भागातील घंटागाडी ट्रॅक करता यावी यासाठी विकसित केलेल्या 'माझा स्वच्छता साथी' ॲपची कार्यप्रणाली यावेळी समजावून सांगण्यात आली. स्वच्छतेसोबतच, शिष्टमंडळाने महापालिकेच्या महसूल वाढीसाठी राबवल्या जाणाऱ्या पाणीपट्टी आणि मालमत्ता कर संकलन मॉड्युल्सची सखोल माहिती घेतली. कर वसुलीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणि वेग कसा आणला जातो, याचे सादरीकरणही यावेळी करण्यात आले.

यावेळी स्मार्ट सिटीचे प्रकल्प व्यवस्थापक फैज अली, नौमान खान आणि मीडिया अनालिस्ट अर्पिता शरद यांनी स्मार्ट सिटीच्या तांत्रिक प्रकल्पांची माहिती दिली. तसेच स्वच्छ भारत मिशनचे शहर समन्वयक चेतन वाघ आणि किरण जाधव यांनी स्वच्छता मोहिमेतील बारकावे आणि क्षेत्रीय स्तरावरील काम काजाचे स्वरूप स्पष्ट केले. तंत्रज्ञानाच्या मदतीने नागरी सेवा आणि कर वसुली अधिक प्रभावी कशी करता येते, हे या दौऱ्यातून बीदरच्या टीमने समजून घेतले.

गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिरमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) - गुरुदेव समंतभद्र विद्यामंदिर मध्ये भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमाच्या रेलचेल मध्ये साजरा करण्यात आला यावेळी सकाळी वेरूळ गावातून प्रशालेतील १२०० विद्यार्थ्यांची भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. 'भारतीय प्रजासत्ताक दिन चिरायू हो' 'जय जवान जय किसान' या नाऱ्यांनी वेरूळ गावातील गावकऱ्यांचे लक्ष प्रभात फेरीकडे आकर्षित झाले होते.

प्रशालेच्या भव्य प्रांगणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त दिनेश गंगवाल महामंत्री डॉ. प्रेमचंद पाटणी शालेय समिती अध्यक्ष मदनलाल पांडे कोषाध्यक्ष सुमित ठोले, ध्वजारोहक गौतमजी ठोले माजी मुख्याध्यापक निर्मल ठोले शिक्षक संजय महाजन अरुण तपशी राजेंद्र अंबरकर बाल ब्रह्मचारी पंडित मनीष भैया यांची प्रमुख उपस्थिती होती विद्यार्थ्यांच्या दैनंदिन परिपाठ अंतरंग शासन स्तरावरून आयोजित परिपत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कवायत कार्यक्रमाचे आयोजन यावेळी करण्यात आले . या कार्यक्रमासाठी तहसीलदार संतोष गुट्टे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक गटविस्तार अधिकारी सचिन वाघ व शिक्षण विस्तार अधिकारी किशोर केवट उपस्थित होते.यासाठी प्रशालेचे क्रीडा शिक्षक आशिष कान्हेड दिपाली बाहेती यांचे प्रमुख मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यावेळी गुलाबचंद बोराळकर यांनी केले तर प्रजासत्ताक दिनावर प्रज्वल आवटी या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले विद्यार्थ्यांतील कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टीने लेझीम पथकाच्या माध्यमातून त्रिकोण चौकोन स्वस्तिक आयात व प्रशालेचे नाव काढून विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवरांना अचंबीत केले या लेझीम साठी विद्यार्थ्यांना सचिन अन्नदाते वीरेंद्र वाकळे अंकुश ठोले स्वप्निल गोसावी आनंद गंगवाल यांचे मार्गदर्शन लाभले. गुरुकुल मधील विद्यार्थ्यांनी मानवी मनोऱ्याचे प्रयोग सादर केले. यासाठी हर्षवर्धन महाजन व मार्मिक गोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले भारतीय संविधानाचे महत्त्व सर्वांना लक्षात आणून देण्याच्या दृष्टीने सुहास मिश्रीकोटकर यांच्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी संविधान पथनाट्य सादर केले.

तर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राची प्रसिद्ध लावणी गवळण बंजारा गीत भांगडा इत्यादी सिने गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्याचा कार्यक्रम सादर केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर सुकुमार नवले महेंद्र वाकळे यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांना राजकुमार नरखडे संतोष जैन अशोक सोनवणे पारस जैन दीपक जैन कैलास गोरे सुरज मेहत्रे प्रतिभा गंगवाल राजकुमार नरखडे प्रीतम सावजी विक्रांत करेवार पुनम लोहाडे इत्यादीचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे कलागुण पाहण्यासाठी यावेळी गावातील पालकांनी प्रचंड गर्दी केली होती अशी माहिती अतुल बादे नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली

संत ताजुद्दीन बाबांची महिमा अपरंपार



संत ताजुद्दीन बाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक मानल्या जाते. कारण संपूर्ण धर्माचे लोक बाबांच्या दर्शनासाठी येतात.भारत ही संतांची भूमी आहे.ही बाब संपूर्ण जग जाणतो. कारण या भुमित संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम,संत नामदेव,संत ताजुद्दीन बाबा,संत गजानन महाराज,संत साईबाबा इत्यादी अनेक संतांचा जन्म महाराष्ट्रात झालेला आहे.त्यामुळेच महाराष्ट्राला संतांची भूमीचा दर्जा मिळाला आहे.भारत भुमित कोणत्या-ना-कोणत्या रूपाने प्रत्येक धर्मात संत या भुमित जन्म घेत असतात व सर्वच धर्माच्या संस्कृतीचे जतन होत असते.आज संपूर्ण जग जाणते की भारत हे शांततेचे प्रतिक आहे.याचे मुख्य कारण म्हणजे या भुमित अनेक धर्म जन्माला आलेत त्यामुळेच अनेक संस्कृती दिसून येतात आणि मुख्यत्वे करून एकोप्याने राहतात हाच संत भुमिचा खरा गोडवा आहे.

नागपूरातील संत ताजुद्दीन बाबा यांची अपार महिमा आपल्याला पहायला मिळते आणि जगजाहीर आहे.ताजुद्दीन बाबांचा जन्म २७ जानेवारी १८६१ ला नागपूर शहरापासून १५ किलोमीटरवर असलेल्या कामठी या गावी झाला.बाबा एकवर्षाचे असतांनाच त्यांच्या वडिलांचा देहान्त झाला.यानंतर त्यांच्या ९ वर्षाच्या वयातच आईचा सुध्दा स्वर्गवास झाला.यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजीने करून त्यांना लहाण्याचे मोठे केले. ताजुद्दीन कामठीतील मदरशांमध्ये शिकत होते. कामठीतील मदरशांमध्ये अचानक हजरत अब्दुल्ला शाह नावाचे फकीर आले आणि त्यांची नजर (बालक) बाबा ताजुद्दीनवर पडली.त्यावेळेस त्या फकीराने शिक्षकाला विचारले 'तुम इनको क्या पढाते हो' शिक्षक स्तब्ध झाले आणि फकीरच म्हणाले यह बालक (बाबा ताजुद्दीन) जन्मसेही सब कुछ सीखकर आया है.इतके बोलुन फकीर तेथुन निघुन गेले. ताजुद्दीन बाबांना त्यांच्या मामांनी १८८१ मध्ये म्हणजे वयाच्या २० व्या वर्षी नागपूरची रेजीमेंट नं. १३ मध्ये भर्ती केले.तीन वर्षांनंतर त्यांना मद्रासमधील सागरला पाठविण्यात आले.मद्रासी पलटनमध्ये अचानक विराण जागेवर संत हजरत दाऊद यांच्याशी भेट झाली आणि संपूर्ण रात्र सोबत भजन-कव्वालीमध्ये तल्लीन झाले. ताजुद्दीन बाबा स्वतः देवांच्या आठवणीत डुबुन रहायचे. असे सांगितले जाते की बाबांची ड्युटी 'शस्त्रभंडार' देखभाल करण्यावर होती. बाबा आपला पहारा चोख देत होते, अशावेळी रात्री २ वाजता अचानक इंग्रज कैप्टन त्या जागेची पाहणी करायला आला. पाहणी झाल्यानंतर कैप्टन वापस जायला लागला. काही अंतरावर जात नाही तर त्याला जो शिपाई पहारा (ताजुद्दीन) देत होता तोच शिपाई पुन्हा दिसला. कैप्टनला गुस्सा आला पुन्हा वापस पहिल्या जागेवर गेला तर तीथे पहाले तर तो शिपाई (ताजुद्दीन)आपल्या जागेवरच होता.यानंतर इंग्रज ऑफिसरने बाबांना पेशीसाठी बोलावले व विचारले की आम्ही तुम्हाला दोन-दोन ठीकाणी पहाले.तुम्ही देवाचे अवतार आहात का? यावर बाबांना घुस्सा आला.परंतु इंग्रज समजले हा शिपाई साधारण व्यक्ती नसून संत महात्मा आहे.हा त्यांचा पहिला चमत्कार दिसून आला.कालांतराने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.बाबांची वेगवेगळी हरकते पाहून त्यांच्या आजीने ताजुद्दीनला पुन्हा काम ठीला आणले व अनेक डॉक्टरांना दाखविले. परंतु त्यांनी आत्मा व परमात्माची एकरूपता अवगत केल्याचे दिसून आले.काही लोक त्यांना पागल समजायला लागले.परंतु हळूहळू त्यांच्या हातुन अनेक चमत्कार दिसायला लागले.पीडीत लोक आपले दुःख-वेदना बाबांना सांगायला लागले व त्यांच्या नेत्रदृष्टीने बरेही व्हायला लागले.बाबांचे चमत्कार दुर-दुर पर्यंत पसरायला लागले.परंतु काही लोक आपल्या चमत्काराचा चुकीचा फायदा घेत असल्याचे लक्षात आले.तेव्हा त्यांनी पागल असल्याचे सोंग करने सुरू केले व लोक त्यांच्या हरकतींना त्रासुन पोलिस कंप्लेंट केली व २६ ऑगस्ट १८९२ ला कामठीच्या कैन्टोनमेन्ट व जिल्हा मॅजेस्टेटने पागलखान्यात पाठविले. पागलखाण्यात लॉकपहध्ये बंद केल्यानंतरही लोकांना बाबा नागपूरच्या अनेक भागात दिसत होते. हा चमत्कार सर्वच मोठ-मोठ्या ऑफिसरच्या लक्षात आला.असे अनेक चमत्कार लोकांना दिसायला लागले व बाबा ताजुद्दीन संत झाले.२१ सप्टेंबर १९०८ ला नागपूरचे महाराजा श्रीमंत राजा बहादुर राधोजीराव भोसले यांच्या प्रयत्नाने बाबांना पागलखान्यातुन मुक्त केले राजाने आपल्या महालात आणले व राजांनी ताजुद्दीन बाबांची सेवा केली.संत ताजुद्दीन बाबा हिंदू-मुस्लिमांचे प्रेरणादायी प्रतिक होते.बाबांची तब्बेत काही दिवसांत खालावली व १७ ऑगस्ट १९२५ ला श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची प्राणज्योत मालवली. त्यामुळे नाम समाधी म्हणून सक्करदरा येथील श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची समाधी बांधण्यात आली यालाच 'लहान ताजबाग' म्हणतात.इथे हिंदू प्रथेनुसार मोठ्या प्रमाणात आजही पुजा-अर्चना केली जाते व अंतिम संस्कार लहान ताजबागपासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या ताजबाग येथे करण्यात आला याला 'मोठा ताजबाग' म्हणतात. इथे मुस्लिम पध्दतीने पुजाअर्चना केली जाते. याप्रमाणे 'मोठा ताजबाग व लहान ताजबाग' हे दोन्ही पवित्र स्थान भारतभर प्रसिद्ध आहे या ठीकाणी दोन्ही धर्माचे लोक एकत्र येतात ही नागपूरसाठी गौरवास्पद बाब आहे.संत ताजुद्दीन बाबांनी आपले पाय ज्या-ज्या ठिकाणी रोवले त्या-त्या ठिकाणी दर्गा आपल्याला पहायला मिळते व बाबांचे दर्शन होते.बाबाचे अनेक प्रसिद्ध ठिकाण आहेत यात मोठा ताजबाग, लहान ताजबाग, वाकी, पागलखाना हे प्रसिद्ध ठिकाण आजही प्रसिद्ध आहे.बाबाच्या जयंती निमित्त शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात येते.त्यामुळे संपूर्ण भक्तांना विनंती आहे की, वाढते हवामानातील बदल व प्रदुषणाचा धोका पहाता बाबांच्या जयंतीच्या निमित्ताने आपापल्या पद्धतीने संपूर्ण धर्माच्या भक्तांनी वृक्षारोपण करावे. यामुळे आपल्याला शुद्ध हवा मिळेल व ऑक्सिजनची मात्रा वाढेल यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण होईल.अशा पध्दतीने वृक्षलागवड झाली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला बाबांचे दर्शन अवश्य होईल व ही आठवण मनुष्याच्या हृदयात अनंत काळापर्यंत राहील. कारण बाबांचा सहवास नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचा त्यामुळे वृक्षलागवड अती आवश्यक आहे.संत ताजुद्दीन बाबांना कोटी कोटी प्रणाम.

– रमेश कृष्णराव लांजेवार

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकाच वेळी 'आरोग्य समुपदेशन कार्यशाळा' यशस्वी

छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी मा. श्री. दिलीप स्वामी, भा.प्र.से. यांच्या संकल्पनेतून तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या सानिध्यात, विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य संवर्धनासाठी दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत मनपा हद्दीतील सर्व शाळांमध्ये एकाच वेळी 'आरोग्य समुपदेशन कार्यशाळा' यशस्वीपणे आयोजित करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत मनपा हद्दीतील २२८ तसेच महानगरपालिकेच्या ३२ शाळांमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आले होते. नारेगाव मनपा शाळेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा व सहाय्यक वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भामरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती काजवे, तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये संतुलित आहार, जंक फ़ूड चे दुष्परिणाम, वैयक्तिक स्वच्छता, मोबाईल व स्क्रीन टाइम मर्यादा, मानसिक आरोग्य, किशोरवयीन समस्या व व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम, सिकलसेल ॲनिमिया, क्षयरोग मुक्तभारत याबाबत तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तर व समुपदेशन सत्रांमधून विद्यार्थ्यांच्या शंका समाधान करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयीची जागरूकता निर्माण करून त्यांना सक्षम व जबाबदार नागरिक घडविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. सर्व आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

संत ज्ञानेश्वर उद्यानाला एक वर्ष पूर्ण; पर्यटकांचे गुलाब देऊन स्वागत

पैठण दि.२८ (प्रतिनिधी)- पैठण संत ज्ञानेश्वर उद्यान सुरू होऊन एक वर्ष पूर्ण झाले. या निमित्त उद्यानात आलेल्या पर्यटकांचे गुलाब फुले देऊन स्वागत करण्यात आले. उद्यान विकास समितीच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला. या वेळी प्रा. संतोष गव्हाणे, रमेश शेळके, बाळू आहेर, बजरंग काळे, शिवाजी गाढे आणि अभियंता दीपक डोंगरे उपस्थित होते. २६ जानेवारी २०२३ रोजी हे उद्यान सुरू झाले होते. गेल्या एका वर्षात लाखो पर्यटकांनी येथे भेट दिली. 'दिव्य मराठी'च्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे उद्यान सुरू झाले. पाच एकरमध्ये ॲडव्हेंचर पार्कचे काम पूर्ण झाले आहे. लवकरच ते पर्यटकांसाठी खुले होणार आहे. बाल कांसाठी ४० हून अधिक प्रकारची आधुनिक खेळणी बसवली जाणार आहेत. उद्यान सध्या संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत सुरू असते. ही वेळ वाढवून दुपारी १२ ते रात्री ८ पर्यंत करावी, तसेच सोमवारीही उद्यान खुले ठेवावे, अशी मागणी प्रा. संतोष गव्हाणे, रमेश शेळके, बाळू आहेर, पवन लोहिया आणि रमेश लिंबोरे यांनी केली.

४३ वर्षांनंतर पुन्हा भेटले घृष्णेश्वरचे माजी विद्यार्थी; एकत्र आलेल्या वर्गमित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला

खुलताबाद दि.२८ (प्रतिनिधी)- घृष्णेश्वर विद्यालय व महाविद्यालयात १९८२ मध्ये दहावी शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवारी उत्साहात पार पडला. तब्बल ४३ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आलेल्या वर्गमित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. परिसर शालेय आठवणींनी भारून गेला होता. स्नेहमेळाव्याची सुरुवात सकाळी ११ वाजता राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर दिवंगत शिक्षक व सहाध्यायांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सुमारे साठ माजी विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणांहून येत सहभाग नोंदवला. अनेक वर्षांनंतर भेटल्याने आनंद, आपुलकी आणि भावनिक क्षण अनुभवायला मिळाले. अफसर अली बेग व जैवंत खैरनार यांनी शालेय संस्कार आणि एकजुटीचे महत्त्व सांगितले. शिक्षकांचे मार्गदर्शनच यशामागचे कारण असल्याचे त्यांनी नमूद केले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून दिला. स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी हिंदीचे शिक्षक बेग सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून खैरनार सर, रवी सर आणि नगरसेवक कैलास बारगळ उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र दांडेकर यांनी केले. आभार विलास सोमवंशी यांनी मानले. स्नेहमेळाव्या साठी रईस विलास सोमवंशी, जहागीरदार, रवी जाधव, गुलाम मोहम्मद, इसाक कुरेशी, प्रल्हाद घोडके, राजेंद्र दांडेकर आणि गोरखनाथ वाकळे यांनी मेहनत घेतली.

भारतीय समाज सेवा केंद्रास 'एरिया'तर्फे सौर ऊर्जा प्रकल्प भेट

महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- महावितरणच्या आवाहनास प्रतिसाद देत ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनतर्फे (एरिया) भारतीय समाज सेवा केंद्रास १० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प भेट देण्यात आला. या प्रकल्पाचे उद्घाटन महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते २६ जानेवारीस करण्यात आले.

यावेळी 'एरिया'चे जिल्हाध्यक्ष गोविंद पाटील, निसर्गोपचारतज्ज्ञ डॉ.योगिता कछोट, केंद्राच्या संचालक छाया पवार, कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक सोलर एजन्सीने सामाजिक बांधिलकी म्हणून गरजू व्यक्ती व सामाजिक संस्थांना सौर प्रकल्प मोफत बसवून देण्याचे आवाहन मुख्य अभियंता कछोट यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत 'एरिया'च्या वतीने सौर प्रकल्प भेट देण्यात आला. यासाठी जिल्हाध्यक्ष गोविंद पाटील व त्यांच्या २९ सभासदांनी पुढाकार घेतला. यामुळे या भारतीय समाज सेवा केंद्राचा वीजबिलावर दर महिन्यास होणारा २० ते २५ हजारांचा खर्च वाचणार आहे.

यावेळी मुख्य अभियंता कछोट यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यापुढेही अशा गरजू व्यक्ती व संस्थांना सौर संचाच्या माध्यमातून मदत करण्यात 'एरिया'च्या पुढाकार घेईल, अशी अपेक्षा व्यक्त करून कछोट यांनी या सामाजिक उपक्रमाबद्दल संघटनेचे कौतुक केले. संचालिका छाया पवार यांनी प्रकल्पासाठी मदत केल्याबद्दल महावितरण व 'एरिया'चे आभार मानले.

अजितदादांच्या आठवणीत मराठवाडा रडला; नेत्यांना अश्रु अनावर

छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मराठवाड्याशी कायम जिव्हाळ्याचे नाते होते. मागसलेल्या मराठवाड्याचा विकास पश्चिम महाराष्ट्राच्या बरोबरीने करायचा हा ध्यास आणि विचार अजित पवार या भागातील नेत्यांसमोर अनेकदा बोलून दाखवायचे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत तर अजित पवारांनी वारंवार बारामती पॅटर्न आणि पिंपरी चिंचवडच्या विकासाचा उल्लेख केला. मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद आणि अनेक नेते तयार करण्यात अजित पवारांचा मोठा वाटा राहिला आहे.

आज सकाळी अजित पवार यांचे विमान मुंबईहून बारामतीत उतरताना अपघातग्रस्त झाले आणि या दुर्दैवी घटनेते महाराष्ट्राच्या राजकारणातील 'दादा' माणूस गेला. ही दुःखद घटना जेव्हा मराठवाड्यात येऊन धडकली तेव्हा केवळ राष्ट्रवादी काँग्रेसच नाही तर सर्वच पक्षांच्या नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री धनंजय मुंडे, संजय बनसोडे, मराठवाडा पदवीधरचे आमदार सतीश चव्हाण, मराठवाडा शिक्षक मतदरासंघाचे आमदार विक्रम काळे, राजेश विटेकर, प्रताप पाटील चिखलीकर यांचे अश्रू तर थांबतच नव्हते. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, आ.अब्दुल सत्तार, आ. प्रदिप जैस्वाल, माजी खासदार इम्तियाज जलील यांनी अजित दादा पवार यांच्या अकाली निधनावर तिव्र शोक व्यक्त केला.

कालपर्यंत ज्या अजित पवारांसोबत हे नेते प्रचारसभेत होते, मराठवाड्याच्या विकासावर चर्चा करत होते, तो नेताच आज आपल्यात नाही ही कल्पनाच या सगळ्यांना सहन होत नव्हती. चॅनलवरील बातम्या, राज्यभरातील नेते, कार्यकर्त्यांकडून येणारे फोन यानंतर नेत्यांच्या भावना अनावर झाल्या. काय बोलावे हेच अनेकांना सूचत नव्हते. प्रत्येक नेत्याच्या डोळ्यासमोर अजित पवार यांच्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण, त्यांनी मराठवाडा आणि या भागातील जिल्ह्यासाठी केलेल्या कामांचा धडाका हे येत होते.

अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याचे कळताच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे लातूरमध्ये मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांच्या घरी दाखल झाले. दारातच विक्रम काळे यांनी त्यांच्या गळ्यात पडत आपल्या दाटून आलेल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. तिथेच माजी मंत्री संजय बनसोडे आले, त्याचीही अवस्था वेगळी नव्हती. तिकडे परभणीत राजेश विटेकर हे धाय मोकलून रडत होते. नांदेडमध्ये प्रताप पाटील चिखलीकर यांच्या तोंडून शब्द निघत नव्हते. तर मराठवाडा पदवीधरचे आमदार सतीश चव्हाण हे ही स्तब्ध झाले होते.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या जाण्याने मन हेलावून गेले आहे. शोकसंदेश व्यक्त करताना शब्द अपुरे पडत आहेत. महाराष्ट्राच्या दृष्टीने बुधवारची (ता.२८) सकाळ अतिशय दुर्दैवी ठरली आहे. स्वभावाने अजितदादा जरी थोडे फटकळ वाटत असले, तरी मनाने ते तितकेच निर्मळ, पारदर्शक आणि प्रामाणिक होते. त्यांच्या बोलण्यात कधी कधी कठोरपणा जाणवत असे, परंतु ज्या व्यक्तीशी ते फटकळपणे बोलत, त्याच व्यक्तीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्याचे काम करून देणे, हा दादांचा खरा स्वभाव होता.

मी दादांच्या अत्यंत जवळ होतो. त्यांना अतिशय जवळून पाहिले, समजून घेतले. त्यामुळेच त्यांचा हा अचानक आणि दुर्दैवी अपघात स्वप्नातही न पाहिलेला धक्का आहे. कामाच्या बाबतीत असो, नेतृत्वाच्या बाबतीत असो किंवा माणुसकीच्या बाबतीत प्रत्येक क्षेत्रात 'दादा' म्हणून ओळखला जाणारा हा माणूस आज अचानक आपल्यातून निघून गेला आहे, ही बाब अत्यंत वेदनादायक आहे.

दादांशी माझे नाते केवळ राजकीय नव्हते, ते पूर्णपणे वैयक्तिक आणि पितृतुल्य होते. वडिलांच्या निधनानंतर त्यांनीच मला सावरले, आधार दिला आणि आयुष्याला दिशा दिली. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर त्यांनी अपार प्रेम केले, वडिलकीच्या नात्याने घडवले. जिल्हा परिषद सदस्यापासून आमदारापर्यंत नेले. आज त्यांच्या अकाली जाण्याने मी दुसऱ्यांदा पोरका झालो आहे. दादांची उणीव कधीच भरून निघणार नाही. महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनातले त्यांचे योगदान अमूल्य असून ते सदैव प्रेरणास्थान राहील, अशा शब्दात आमदार राजेश विटेकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अत्यंत अभ्यासू नेता महाराष्ट्राने गमावला आहे. शिस्त, कामाचा धडका, वेळेचे नियोजन या गोष्टी अजित दादांकडून शिकण्यासारख्या होत्या. मी जेव्हा पहिल्यांदा आमदार झाले तेव्हा माझ्या पाठीवर थाप मारून मला त्यांनी शुभेच्छा दिल्या होत्या. आता राज्यमंत्री झाले तरी कॅबिनेट बैठकीतही स्वतः 'मेघना तुला काही बोलायचे आहे का'? असे विचारून दुसऱ्यालाही संधी देण्याची त्यांची कार्यपद्धती आठवते. त्यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे, अशा भावना परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी व्यक्त केल्या.

दादा अशी एक्झिट घ्यायची नव्हती... तुम्ही जीवाला चटका लावून गेलात. तुमचा राजकिय आणि अकॅडमिक सेन्स खूप जबरदस्त होता. भाषणातून, विनोद बुद्धीने तुम्ही अनेकांना स्पष्ट बोल नही हसवलं. पण आज तुमच्या जाण्याने तुम्ही कार्यकर्त्यांना रडवलं. महाराष्ट्र एका डायनामिक नेत्याला मुकला आहे. अजितदादांनी आपल्या कामाने, आपल्या वागण्याने राज्याच्या राजकारणात एक वेगळा दरारा निर्माण केला होता. कुशल प्रशासक, दिलेला शब्द पाळणारे व कामाप्रती प्रचंड निष्ठा असलेले व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख असल्याच्या भावना मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केल्या.

मंदिरासह दुकान वाईन शॉप फोडून लाखोंचा ऐवज लंपास

छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- शहरात चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, वेगवेगळ्या भागांत घरफोडी आणि चोऱ्यांचे सत्र सुरूच आहे. गेल्या तीन दिवसांत चोरट्यांनी चेलीपुरा येथील डेली नीड्स, कामगार चौकातील वाईन शॉप आणि मुकुंदनगरातील एका मंदिराला लक्ष्य केले. या तिन्ही घटनांमध्ये चोरट्यांनी ७ लाख ९ हजार रुपयांची रोकड लंपास केली असून, यामुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मुकुंदनगरात मंदिरातील दानपेटी चोरीला मुकुंदनगर भागातील महादेव मंदिराच्या दरवाजाचे कुलूप तोडून दानपेटी चोरीला गेल्याचे समोर आले आहे. ही घटना रविवारी (दि. २५) सकाळी साडेपाचच्या सुमारास रेल्वे गेट क्र. ५६ भागात उघडकीस आली. फिर्यादी कैलास बापूराव मेंडके (५०, रा. मुकुंदनगर) यांच्यासह स्थानिकांनी वर्षभरापूर्वी महादेव मंदिराची स्थापना केली होती. दानपेटीमध्ये अंदाजे पाच ते सहा हजार रुपये होते, असे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाईन शॉप फोडून ६ लाखांची रोकड लंपास वाईन शॉप फोडून चोरट्याने तब्बल ६ लाखांची रोकड लंपास केली. ही घटना शुक्रवारी (दि. २३) मध्यरात्री कामगार चौक, सिडको एन-२ भागात घडली. अशोक शिवनारायण जैस्वाल यांचे कामगार चौकात वाईन शॉप आहे. शॉपवर फिर्यादी वाल्मीक किसनराव नागरे (४६, रा. विश्रांतीनगर) हे मॅनेजर म्हणून काम करतात.

नेहमीप्रमाणे २३ जानेवारीला रात्री ते दुकान बंद करून घरी गेले. मध्यरात्री चोरट्याने चॅनल गेट आणि शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. गल्ल्यातील व तिजोरीतील ५ लाख ९३ हजार आणि १५ हजार चिल्लर अशी रोकड लंपास केली. याप्रकरणी रविवारी (दि. २५) मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुकानचे कुलूप तोडून चोरट्याने १ लाख १० हजारांची रोकड लंपास केली. ही घटना शनिवारी (दि. २४) मध्यरात्री चेलीपुरा येथील फॅमिली ट्रीट डेली नीड्स या दुकानात घडली. फिर्यादी काझी निसरूद्दीन फारोकी काझी नासिरूद्दीन फारोकी (४४, रा. जिन्सी) यांच्या तक्रारीवरून सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खंबीर नेता, उमदा सहकारी गमावला! -उद्धव ठाकरे

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या राजकारणाला आज एक मोठा धक्का बसला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अचानक निधन झाल्याची दुःखद बातमी समोर आली आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण राज्यात आणि राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. अनेक नेते, कार्यकर्ते आणि नागरिक या घटनेने स्तब्ध झाले आहेत.

''एक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील उमदा सहकारी गमावला,'' अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात अजित पवार हे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री राहिले होते. अत्यंत शिस्तप्रिय, आपल्या खात्यावर वचक व अर्थ विभागाचा अभ्यास असणारे ते नेते होते. एक उत्तम सहकारी म्हणून त्यांचे माझे विशेष नाते जमले. अजित पवार हे दिलखुलास होते. मनात येईल ते बोलायचे. ते दीर्घद्वेषी नव्हते. राजकारणात त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, तरी त्यांनी संबंध तुटू दिले नाहीत, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ते 'दादा' म्हणून लोकप्रिय होते. ते असे अकाली जातील असे वाटले नव्हते. कार्यकर्त्यांना जपणारा नेता म्हणून ते परिचित होते. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वात पोकळी निर्माण झाली. ते सर्वार्थाने 'दादा' होते. दादांना माझ्यातर्फे, 'ठाकरे' व शिवसेना परिवारातर्फे श्रद्धांजली! अशी श्रद्धांजली उद्धव ठाकरे यांनी वाहिली.

महाराष्ट्राने उमदा नेता गमावला-राज ठाकरे

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या घटनेवर भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत अजित पवार यांच्या योगदानाची प्रशंसा केली आणि त्यांच्या अकाली निधनावर दुःख व्यक्त केले. राज ठाकरेंनी लिहिले की, महाराष्ट्राने एक उमदा नेता गमावला असून त्यांच्या विचारांनी आणि नेतृत्वाने राज्याच्या राजकारणात महत्त्वाचा ठसा उमटवला होता.

राज ठाकरे यांच्या पोस्टमध्ये त्यांनी अजित पवारांच्या व्यक्तिमत्वाचा आदर व्यक्त केला असून, त्यांच्या कार्याची आठवण सर्वांच्या मनात कायम राहील असे सांगितले. या भावनिक पोस्टद्वारे त्यांनी संपूर्ण राज्याला आणि राजकीय समुदायाला या दुःखद घटनेची जाणीव करून दिली. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एक पोकळी पसरल्याचे जाणवत आहे, असेही राज ठाकरे यांनी नमूद केले.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर

ई-निविदा सुचना क्रमांक (४३६) २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर (दुरध्वनी क्रमांक -०२४०-२३३११७४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या कडुन छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील खालील (०१) कामा करीता 'ब-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑन लाईन) व्दारे मागविण्यात येत आहे.

टिप : १) निविदा कागदपत्राचा तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग संकतेत स्थळावर https://mahatenders.gov.in आणि https://pwd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२) सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

स्वाक्षरीत/ -
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
छत्रपती संभाजीनगर

डीजीआयपीआर/२०२५-२०२६/५३९५